# दोडामार्ग कॉलेजात प्रशिक्षण कार्यशाळा

**कसई दोडामार्ग :** मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने नवनिर्माण महाविद्यालय, दोडामार्ग येथे सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे २० नोव्हेंबर रोजी आयोजन केले आहे.

दोन सत्रात होणाऱ्या या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. दिलीप पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी या विभागाचे सहाय्यक डॉ. कुणाल जाधव, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील आजीवन विस्तार विभागाचे क्षेत्र समन्वयक, प्राध्यापक व विद्यार्थी व्यवस्थापक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन नवनिर्माण महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. एस. इंगळे यांनी केले आहे. (वार्ताहर)